स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 31–07–2014** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 5. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 6. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 7. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 10. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 11. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 12. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 13. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |
| 14. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 2. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. श्याम वर्धने, आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 69 :– सोनेगांव सरोवराकरिता दोन आर.सी.सी.पाईप लाईन 900 मि.मी. व्यासाचे ओव्हर फ्लो पाईप्स टाकण्याचे कामाकरिता स्थायी समितीव्दारे ठराव क्र. 105, दिनांक 13.09.2013 नुसार प्राकनास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. वरील कामाकरिता रितसर निविदा मागविण्यात आली असता चौथ्या वेळेस एकच कंत्राटदार मेसर्स गंगा इंजिनिअर्स,नागपूर यांची निविदा प्राप्त झाली. कंत्राटदाराची एकमेव प्राप्त निविदा प्राकलनीय राशी पेक्षा 19% नी जास्त (CSR 2013-14 च्या दराप्रमाणे 5.83 % नी जास्त ) असून एकूण रु.57,48,.57.00 च्या या निविदेला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 70</u> :– प्रभाग क्र. 40 (ब ), गांधीबाग प्रभागातील धोंडबाचौक खदान परिसरात सिमेंट रोड चे बांधकाम करण्याच्या कामास्तव मे. आर.एम.दयारामाणी यांची मुळ प्राकलनीय दराची रु. 49,49,146/– (रुपये एकोणपन्नास लक्ष एकोणपन्नास हजार एकशे सेहेचाळीस फक्त) रकमेची सुधारीत निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 71</u> :– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट विभागाव्दारे नागपूर शहरातील रस्त्याची दुरुस्ती व सुस्थितीच्या कामाकरिता लेबर पुरवठा करण्याकरिता रु.3498337/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व तदनंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 72</u> :– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट एम.आय.आय.डि.सी.हिंगणा करिता डांबर एच.पि.सि.एल./ बि.पि.सि.एल/आय.ओ.सि.एल रिफायनरीज मुंबई कडून डांबर वाहतुक करण्याच्या कामाकरिता रु.39,55,775.00 राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा व तदनंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 73</u> :– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट करिता नागपूर शहरातील रस्त्याची दुरुस्ती व सुस्थिती व तसेच डांबरीकरण्याच्या कामासाठी मे. हिंदूस्थान पेट्रोलियम कारपोरेशन लिमिटेड ( एच.पि.सि.एल.) या राष्ट्रीष्कृत कंपनीकडून अग्रिमव्दारे रु. 3,49,77,290.00 राशीचे डांबर खरेदी करण्याचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 74</u> :– स्थायी समिती ठराव क्र.181, दि.24.10.2008 च्या मान्यतेनुसार नागपूर महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळांमध्ये सामायिक प्रयोगशाळा स्थापन विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण व प्रशिक्षण देण्यास्तव अनुक्रमे मे. कॉम्प्युटर बिझनेस मॅनेजमेंट व मे. एव्हरॉन एज्युकेशन लि.यांना 5 वर्षाचे कालावधीकरिता शैक्षणिक सत्र 2009–10 पासून 62.5 टक्के व 37.5 टक्के या प्रमाणात कार्य विभागून देण्यात आलेले होते.

शैक्षणिक सत्र 2009–10 ते सत्र 2013 – 14 या कालावधीत प्रस्तुत संस्थानी
1) CAL (Computer Aided Learing ) या उपक्रमांतर्गत प्रती विद्यार्थी रु.551.60/–
2) CEP (Computer Education Program ) इयत्ता 5 वी ते 8 वी विद्यार्थ्यांकरिता प्रति विद्यार्थी रु.558/–
3) ICT इयत्ता 9 वी चे विद्यार्थ्यांकरिता प्रति विद्यार्थी रु. 558/–या दरावर समाधानकारकरित्या कार्य पूर्ण केले आहे.

प्रस्तुत संस्थासोबत केलेल्या करारनाम्याप्रमाणे प्रकल्प कालावधी 5 वर्षे असून प्रस्तुत मुदत शैक्षणिक सत्र 2014 – 15 चे सुरुवातीला संपलेली आहे. यामुळे मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण प्राप्त व्हावे याकरिता नविन निविदा मागविण्याबाबत कार्यवाही करणे अपेक्षित आहे व प्रस्तुत निविदा प्रक्रियेचे कार्य पूर्ण होईपर्यंत उपरोक्त नमूद मे. कॉम्प्युटर बिझनेस मॅनेजमेंट व मे. एव्हरॉन एज्युकेशन लि.यांना खालीलपैकी कोणताही एक पर्याय स्विकारुन ज्या दरावर सद्यःस्थितीत जे कार्य करीत आहेत त्यावर म्हणजेच अ) CAL रु.551/– प्रती विद्यार्थी प्रती विद्यार्थी प्रती शैक्षणिक सत्र, ब) CEP रु.558/– प्रती विद्यार्थी प्रती विद्यार्थी प्रती शैक्षणिक सत्र, क) ICT रु.558/– प्रती विद्यार्थी प्रती विद्यार्थी प्रती शैक्षणिक सत्र प्रमाणे
1) ज्या दरावर सद्यःस्थितीत कार्यकरिता आहेत त्या दरावर निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सद्यःस्थितीत असलेल्या पायाभूत सुविधांना कायम ठेवून मुदत वाढ द्यावी.

किंवा

2) मुदत वाढीसाठी 2 महिने किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सद्यःस्थितीत असलेल्या पायाभूत सुविधांना कायम ठेवून यापैकी जे काही घडेल तोपर्यंत मुदत वाढ द्यावी.

तरी पर्याय क्र.1 किंवा 2 यापैकी एक स्वि कारुन संगणक प्रकल्पास मुदत वाढ देण्यात मंजुरी व प्रस्तुत कालावधीत निविदा प्रक्रिया राबविण्यास मंजुरी देण्याचा विचारात घेण्यास्तव ठरावाचे प्रारुप सादर. समितीने विचारात घेऊन ज्या दरावर सद्यःस्थितीत कार्य करीत आहेत त्या दरावर निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सद्यः स्थितीत असलेल्या पायाभूत सुविधांना कायम ठेवून मुदत वाढ देण्यासह निविदा काढण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 75</u> :– प्रभाग क्र. 40 (अ आणि ब ) मध्ये लाल इमली चौक ते धनराज यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीटच्या रस्त्याच्या बांधकामास्तव प्राप्त 4 निविदापैकी मे. आर. एम.दयारामाणी यांची मुळ प्राकलनीय दराची रु.29,99,511/– (रुपये एकोणतीस लक्ष नव्याण्णव हजार पाचशे अकरा फक्त ) रकमेची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम फीक्स प्रायरीटी अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 30.00 लक्ष पर्यंत सीमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 76</u>:– प्रभाग क्र.71 टाकळी सिम केशव माधव नगर,अध्यापक ले–आऊट रेंघेनगर येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव विभागाव्दारे तयार करण्यात आलेल्या रु. 2949555/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 A22001330802 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 77</u> :– प्रभाग क्र. 40 (ब ), गांधीबाग येथील प्रितम हॉटेल ते रजाई भवन पर्यंत सिमेंट रोड चे बांधकाम करण्याच्या कामास्तव मे. आर.एम.दयारामाणी यांची मुळ प्राकलनीय दराची रु. 49,98,038/– (रुपये एकोणपन्नास लक्ष अठ्ठयाण्णव हजार अडतीस फक्त ) रकमेची सुधारीत निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 78</u> :– नागपूर मनपाच्या सन 2014–15 आर्थीक वर्षाची मालमत्ता कराचे देयके गतवर्षी निश्चित केलेल्या रु.04.50 प्रती मागणी देय दरांवर इच्छुक खाजगी कुरीअर एंजन्सी मार्फत वाटण्यास तसेच या वरील अपेक्षित खर्च रुपये 22.35 लक्ष खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 79</u>:– प्रभाग क्र. 16 ब शांतीनगर तेलीपुरा कॉलनी, जागृतीनगर व बागडे प्लॉट येथील वसाहतीमध्ये भुमिगत नाली टाकण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. जी.के.घायवट यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 2.23 प्रतिशत कमी दराची रु. 29,32,924/– ( एकोणतीस लक्ष बत्तीस हजार नऊशे चोविस फक्त ) दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 80</u>:– प्रभाग क्रमांक 62 (ब) आकाशनगर, अवधुतनगर, येथे मानेवाडा नाल्याची संरक्षण भिंत बांधण्याच्या कामास्तव रू. 49,89,880/– (एकोणपन्नास लक्ष एकोननव्वद हजार आठशे अन्शी फक्त ) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व वर्षे 2014 –15 हया आर्थिक वर्षात पद क्र. A43901370812 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 81</u>:— नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालय व इतर महत्वाच्या विभागामध्ये असलेली मालमत्ता, इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरिता एकूण 323 सुरक्षा रक्षक कार्यरत असुन कंत्राटाची मुदत 31.08.2014 ला संपुष्टात येत आहे. पुढील कालावधी 2014—15 ते 2015—16 करीता शासनाचे किमान वेतन व इतर लागु असलेले भत्ते प्रमाणे खाजगी सुरक्षा एजन्सी यांचेकडून नविन ई— निविदा प्रमाणे खाजगी सुरक्षा एजन्सी यांचेकडून नविन ई—निविदा बोलावण्याकरिता मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 82</u>:— प्रभाग क्रमांक 62 (ब) भोलेबाबानगर, श्रीरामनगर, येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 36,88,550/— ( छस्तीस लक्ष अठठयांन्शी हजार पाचशे पन्नास फक्त ) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व वर्षे 2014 —15 हया आर्थिक वर्षात पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 83</u>:— ऐंडरवाडी सतरंजीपुरा येथे क्षेत्रीय कार्यालयव नागरी सुविधा केद्राच्या इमारतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. अबरार अहमद यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 0.5 प्रतिशत कमी दराची रु. 1,80,32,339/— ( एक करोड अंशी लक्ष बत्तीस हजार तीनशे ऐकोणचाळीस फक्त ) दरची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सभापती :— महानगरपालिकेमध्ये कार्यरत कर्मचारी व अधिकारी वर्ग किती आहेत त्याची माहिती प्रशासनाने द्यावी.

सहा. आयुक्त (सा.प्र.वि) :— मा. सभापती महोदय, एकुण मंजुर पदे 15,298 असून सद्या 8100 च्या जवळपास कार्यरत पदे आहेत.

सभापतीः— महापालिकेच्या कार्यालयात किती कर्मचारी व अधिकारी वर्ग आहेत आणि त्यांच्याकडे कोणत्या स्वरूपाची कामे देण्यात आली आहेत याबाबत माहिती देण्यात यावी.

आयुक्तः— महापालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचा—यांमध्ये सफाई कर्मचारी आणि वर्ग 4 च्या कर्मचा—यांचा सुध्दा समावेश आहे. त्या प्रत्येक कर्मचा—याकडे कोणत्या प्रकारचे काम दिलेले आहे याची माहिती सध्या सांगता येणार नाही. ती माहिती द्यायला बराच वेळ लागणार आहे. त्यामूळे आपल्याला कोणती माहिती पाहिजे आहे त्याची प्रश्नावली आपण दिल्यास ती आपणास पुरविण्यात येईल.

सभापती :— आतापर्यंत किती कर्मचारी निलंबित आहेत,. किती अधिकारी निलंबित होवून 75 टक्के पगार घेत आहे. त्यांची काय प्रक्रिया आहे त्यांची चौकशी पुर्ण झाली आहे काय? या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

अपर आयुक्त :– मा. सभापती महोदय, या प्रकरणामध्ये मागील 2 वर्षापासुन आढावा घेत आहे. जास्तीतजास्त निलंबित कर्मचा–यांना रिइंस्टिेट केले आहे. परंतु ज्यांच्यावर गंभीर स्वरुपाचे तसेच ॲण्टीकरप्शन विभागाशी संबंधित गंभीर गुन्हे लागले आहे त्यासंदर्भात मात्र निर्णय व्हायचे आहेत. मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार निलंबन आढावा समिती तयार केली आहे. त्यामुळे वारंवार त्या समितीची मिटींग घेवून त्यामध्ये निलंबनाच्या प्रकरणांमध्ये निर्णय सुध्दा घेण्यात येत आहे.

सभापती :– काही कर्मचा–यांना मेडीकल बोर्डाने काम करण्याकरिता अपात्र ठरविले आहे. अशा कर्मचा–यांच्या बाबतीत त्यांच्या परिवारातील व्यक्तिला किती दिवसात नोकरीवर घेता येते.

उपनिगम आयुक्त :– या संदर्भात शासन निर्णय आहे त्या नुसार कार्यवाही करण्यांत येते.

आरोग्य उपसंचालक :– मा. सभापती महोदय, सफाई कर्मचा–यांच्या बाबतीत लाड समिती अंतर्गत त्यांचे पद त्यांच्या वारसदाराला 30 दिवसाच्या आत देण्याची तरतूद आहे.

आयुक्त :– मा. सभापती महोदय, मागे सभागृहामध्ये निर्णय घेतला होता त्यामध्ये 700 कर्मचा–यांचा बॅकलॉग भरायचा होता. त्यामध्ये पहिल्या लॉटमध्ये 100 कर्मचारी आणि प्रत्येक महिन्यामध्ये 25–25 कर्मचारी असा निर्णय झाला. त्याप्रमाणे आता जवळपास 400 कर्मचा–यांचा बॅकलॉग भरून काढला आहे. आता 300 कर्मचारी राहिले आहेत आणि 7 महिन्याच्या कालावधी मध्ये जेवढे लोक सेवा निवृत्त झाले असेल किंवा मृत झाले असेल असेच कर्मचारी राहिले आहे.

सभापती :– आपल्या येथे पुर्वी सिव्हील कार्यालयातून येथील इंजिनिअरला अतिक्रमणाची नोटीस देणे, अतिक्रमणाच्या टीमसोबत स्वःत जावून होर्डींग काढणे, एफ.आय.आर. दर्ज करणे ही कामे सिव्हील कार्यालयाच्या माध्यमातुन होत असे. आपला स्टॉफ मध्ये अधिक्षक पासुन सहा. आयुक्त आणि 10 ते 12 होते. अशाप्रकारे त्यावेळी कामे होत असे. केंद्रीय स्तरावरून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही अतिक्रमण विभागामार्फत केली जात असे. आता झोन स्तरावरून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येते. झोन स्तरावरील जे.ई.कडे कामाचा व्याप वाढल्यामुळे केंद्रीय स्तरावरील फाईल झोन कार्यालयात पडली असते व त्याची काहीच माहिती कुणाला नसते म्हणुन ही अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केंद्रीय स्तरावरून केली पाहिजे. तशाप्रकारचे परिपत्रक काढण्यात यावे.झोन स्तरावर अधिक्षक या पदावरील जे कर्मचारी असतात त्यांना फक्त एन्ट्री करण्याचे काम असते. अशा कर्मचा–यांना अतिक्रमणाच्या संदर्भात, एफ.आय. आर दर्ज करणे तसेच अतिक्रमणाच्या गॅग सोबत जावून अतिक्रमणाची कार्यवाही मधे भाग घेणे असे काम दिले पाहिजे. अशा लोकांचे यासाठी ऑर्डर काढले पाहिजे.

आयुक्त :— मा. सभापती महोदय, अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केंद्रीय स्तरावर करणे शक्य नाही. पूर्वी शहराचे आकारमान कमी होते आज शहराचे आकारमान खुप मोठे झाले आहे. 3000 चौ.मी. कार्यवाहीची परवानगी स्थानिक लेव्हलवर दिली जाते. जो काही मार्जीनल स्पेस दिला जातो त्या ठिकाणी अतिक्रमण केले जाते तसेच ज्या ठिकाणी दोन ऐवजी चार मजले बांधले गेले आहे. यावर देखरेख ठेवण्याचे काम केंद्रीय स्तरावरून करणे शक्य नाही. ज्युनियर इंजीनीअरचा कामाचा व्याप वाढला आहे म्हणुन एकत्रीकरण करणे योग्य नाही. कोणत्या जे.ई. ला कुठल्या प्रकारचा कामाचा लोड आहे त्यावर त्यानुसार सोल्युशन काढता येईल. आज आपण बघितले तर वर्षभरामध्ये लक्ष्मीनगर झोनमध्ये 10 ठिकाणी रस्त्यावरील अतिक्रमण काढले गेले आहे. झोन स्तरावर जे.ई.,डेप्युटी इंजिनिअर, एक्झक्युटिव्ह इंजिनिअर दिले गेले आहे. हायकोर्टाने डायरेक्शन दिले तेव्हा पासुन अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करीत आहे. यापूर्वी कित्येक वर्षापासून अतिक्रमणाच्या संदर्भात नोटीस दिल्या गेल्या होत्या परंतु त्यावर अतिक्रमणाची कार्यवाही करण्यात आली नाही. संपुर्ण शहरात होणारे अतिक्रमण, लावलेले अनधिकृत होर्डिंग काढण्यासाठी केंद्रीय स्तरावरून टीम पाठविणे शक्य होणार नाही.

सभापती :— झोन लेव्हलला या कामाकरिता एक अधिकारी नियुक्त करावा.

आयुक्त :— मा. सभापती महोदय, अतिक्रमणाच्या बाबतीत मोठया प्रमाणात अतिक्रमण वाढत आहे त्यासाठी हायकोर्टाने आदेश दिले आहे. हायकोर्टात या संदर्भात महापालिकेने शपथपत्र सादर केले आहे. गांधीबाग झोनमध्ये मोठे अतिक्रमण काढले आहे. त्यावेळी अतिक्रमणाची संपुर्ण टीम, सहा.आयुक्त आणि मी स्वःत उपस्थित होतो. धरमपेठ झोनमध्ये 4 मजली इमारत पाडली तेव्हा सर्व टीम उपस्थित होती.

श्री. बंडु तळवेकर :— मा. सभापती महोदय, अतिक्रमणाच्या विषयावर झोन क्रमांक 9 आशीनगर, प्रभाग क्रमांक 3 या माझ्या परिसरामध्ये पी.यु. लॅण्ड, महानगरपालिकेचे दहन घाट प्ले ग्राउंड, फुटपाथ करिता सोडलेल्या जागेवर, मुख्य रोडला लागुन मोठया प्रमाणात 80 फुट, 120 फुटाच्या रस्त्यावर अतिक्रमण केले आहे ते काढलेले नाही. पवन नगर, शिवशक्तीनगर, यशोधरा नगर, संघर्ष नगर, योगी अरविंद नगर, प्रवेश नगर, संजिवनी नगर क्वार्टरचा आजुबाजुचा परिसर या परिसरामध्ये पुर्णपणे अतिक्रमण आहे. याबाबत मी वारंवार तक्रारी दिलेल्या आहे. आज 7 वर्ष पुर्ण झाले तरीही अतिक्रमण काढलेले नाही.

सहा. आयुक्त (आशीनगर झोन) :— मा. सभापती महोदय, याचा रिव्हयू घेवून माहिती सांगतो.

श्रीमती संगिता गि—हेः— मा. सभापती महोदय, खाली प्लाटमध्ये पाणी साचण्याचा एक विषय होता. त्या संदर्भात सुध्दा कार्यवाही करण्यात यावी.

सभापती :– खाली प्लॉटमध्ये पाणी साचून मच्छरांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. या संदर्भात खाली प्लॉट मालकाला नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात यावी. सर्व झोनस्तरावर सहा. आयुक्तांनी व हेल्थ ऑफीसरने याबाबत कार्यवाही करावी.

श्रीमती सांगोळे :– मा. सभापती महोदय, माझा प्रभाग क्रमांक 2 नारी येथे विविध ठिकाणी खडडे पडलेले आहे ते त्वरीत बुजविण्यात यावे. सुगत नगर बाजाराचा रस्ता आणि कामगार नगर येथे मोठया प्रमाणात खड्डे पडलेले आहेत.

सभापतीः– अतिक्रमण काढण्या संदर्भात नियम तपासून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात यावी.

ठराव क्रमांक 84 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर